**<u>फौ. कि. अर्ज क्र. ११९८/२०२२</u>**
**<u>नि.क्र. १ खाली</u>**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० अन्वये फिर्यादीची पडताळणी</u>**

मी देवा शपथ खरे सांगतो की –

नांव – विशाल मुकुंद गवळी,
वय – ३७ वर्षे,
व्यवसाय – नोकरी,
राहणार – वलवाडी शिवार, देवपूर धुळे.

---------

जितेंद्र प्रभाकर खोडके नावाचा माझा ग्राहक होता. सन २०१९ मध्ये आम्ही रक्कम रुपये १०,१५,०००/– हे कर्ज त्यांना दिले होते. सदर व्यक्तीने ३३ हप्ते भरल्यानंतर सदरची बोझा असलेली मिळकत ही हेमंत चौधरी नावाच्या इसमाला विकली. आम्हाला गहाण असलेली मिळकत आरोपीने दुस–याला विकली त्याबाबत आम्ही पोलिस स्टेशनला तक्रार दिली पण त्यांनी त्या तक्रारीची दखल घेतली नाही. त्यानंतर आम्ही पोलिस अधिक्षक यांना देखील सदरची माहिती दिली होती परंतु त्यांनी देखील कार्यवाही केली नाही म्हणुन सदरचे प्रकरण न्यायालयात दाखल केले. सदरची केस ही आरोपीने एकतर पैसे भरावे किंवा आम्हाला मिळकतीचा ताबा दयावा याकरीता केली आहे.

---------------

(विशाल मुकुंद गवळी)

समक्ष

CHAITANYA HARISHCHANDRA KULKARNI

Digitally signed by CHAITANYA HARISHCHANDRA KULKARNI
Date: 2023.02.24 17:12:58 +0530

दिनांक – २४.०२.२०२३

( चैतन्य ह. कुलकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे (कोर्ट नं.५)